# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 15 May 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १५ मे २०२४ दुपारी १.०० वा.

****

राजस्थानमधल्या झुंझनू जिल्ह्यात कोलिहान खाणीत अडकलेल्या हिंदुस्थान कॉपर लिमिटेड कंपनीच्या दक्षता पथकातील १५ कर्मचाऱ्यांना आज बाहेर काढण्यात यश आलं आहे. काल रात्री  कर्मचाऱ्यांना खाणीत घेऊन जाणारी लिफ्ट तुटल्यामुळं हे सर्वजण खाणीत अडकले होते.

****

७७ व्या कान चित्रपट महोत्सवाला आजपासून फ्रान्समध्ये सुरुवात झाली. या महोत्सवात भारत मंडपम् या भारतीय दालनाचं उद्धघाटन आज चित्रपट क्षेत्रातील दिग्गज कलाकारांच्या उपस्थितीत होणार आहे. या  महोत्सवात प्रथमच "भारत पर्व"चं आयोजन करण्यात आलं असून यामध्ये जगभरातील नामवंत मान्यवर आणि प्रतिनिधी, चित्रपटकर्मी, खरेदीदार आणि विक्री प्रतिनिधी सहभागी होत आहेत. गोव्यात येत्या २० ते २८ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या ५५ वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, इफ्फीचं अधिकृत फलक आणि ट्रेलरचं अनावरण 'भारत पर्व' मध्ये होणार आहे.

****

भारतीय सैन्यातील माजी कर्नल वैभव काळे यांना गाझा पट्टीत रफाह इथं वीरमरण आलं. भारतीय सैन्यातून निवृत्त झाल्यानंतर ते संयुक्त राष्ट्र-यूएनच्या  सैन्यात प्रतिनियुक्तीवर कार्यरत होते. त्यांचं शिक्षण नागपूर इथं झालं होतं.

****

मुंबईत घाटकोपरच्या छेडानगर इथं वादळी वाऱ्यामुळं कोसळलेल्या लोखंडी जाहिरात फलकाखाली  अडकलेल्या गाड्या काढण्याचं काम बचाव पथकामार्फत आजही सुरू आहे. महाकाय फलक कोसळल्यानं त्याखाली असलेल्या वाहनांमधून

इंधन गळती होत आहे, तसंच कोसळलेल्या फलकामुळं पेट्रोल पंप प्रभावित झाल्यानं उपाययोजनेसाठीचे उपकरणं वापरण्यास अडचणी येत असून फलक हटवण्यासाठी अवजड यंत्रांचा वापर केला जात असल्याचं बचाव पथकाच्या सूत्रांनी सांगितलं.

****

घाटकोपर इथं होर्डींग दुर्घटनेनंतर नंदुरबार शहरात अशा दुर्घटना टाळण्यासाठी नंदुरबार नगरपरिषद कार्यवाही करत आहे. शहरातील २२ खाजगी इमारतींवर होर्डींग उभारण्यात आलेले असून या सर्वांचं स्ट्रक्चरल ऑडीट, आणि होर्डींग्ज स्थिरता प्रमाणपत्र पंधरा दिवसांच्या आत पालिकेला सादर करण्याच्या नोटीसा संबंधीतांना देण्यात आल्या आहेत. कुठेही धोकादायक किंवा विना परवानगी होर्डींग आढल्यास तात्काळ कारवाई होणार असल्याची माहीती नंदुरबार नगरपरिषदेच्या वतीनं देण्यात आली आहे.

****

जायकवाडी धरणातून छत्रपती संभाजीनगर शहराला पाणी पुरवठा करण्यासाठीच्या नवीन योजनेचं काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून सुरु आहे. शहराला येत्या डिसेंबरपासून पाणी पुरवठा केला जाणार असून याबाबतचं वेळापत्रक कंत्राटदारांनी खंडपीठात सादर केलं आहे. या अनुषंगानं औरंगाबाद उच्च न्यायालयाचे न्यायामुर्ती रविंद्र घुगे आणि न्यायमुर्ती आर. एम. जोशी यांनी नवीन पाणी पुरवठा योजनेच्या कामाची बिडकीन परिसरात काल पाहणी केली.

गुणवत्ता, दर्जा आणि सुरक्षेच्या दृष्टीनं जलवाहिनीच्या कामाला गती द्यावी, तसंच सर्व जलवाहिनीची कामं सुव्यवस्थित व्यवस्थापन करुनच व्हावी, अशा सुचनाही न्यायमुर्तींनी कंत्राटदारांना दिल्या आहेत.

****

धुळे लोकसभा मतदार संघात निवडणूकीसाठी मतदानाच्या दिवशी अत्यावश्यक सेवेत कार्यरत असलेल्या २०९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी काल टपाली मतपत्रिकाद्वारे मतदान केलं. उद्यापर्यंत हे टपाली मतदान करता येणार आहे. धुळे लोकसभा मतदार संघात धुळे जिल्ह्यातील एकूण एक हजार ९९ अत्यावश्यक सेवेत कार्यरत अधिकारी, कर्मचाऱ्यांनी टपाली मतपत्रिकेद्वारे मतदान करण्यासाठी नोंदणी केली आहे.

****

दुरसंचार विभाग किंवा ट्रायकडून मोबाईल सेवा खंडित करण्याचे इशारे देणारे कॉल बनावट आहेत. दूरसंचार विभाग किंवा ट्रायनं कोणालाही अशा प्रकारचे कॉल करण्याचे अधिकार दिलेले नाहीत, असं दूरसंचार मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. अशा कॉलसंदर्भात डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू डॉट संचारसाथी डॉट जीओव्ही डॉट इन या संकेतस्थळावर तक्रार नोंदवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. आपण सरकारी अधिकारी असल्याचं भासवणाऱ्या आणि लोकांना फसवणाऱ्या परदेशी मूळ स्थान असलेल्या मोबाईल क्रमांकांवरून येणाऱ्या व्हॉटसॲप कॉलबाबतही दूरसंचार विभागानं एक नियमावली जारी केली आहे.

****

मराठवाड्यासह राज्याच्या बहुतांश भागात येत्या दोन दिवसात वादळी वाऱ्यासह पाऊस पडणार असल्याचा इशारा हवामान खात्यानं दिला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, धाराशिव जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी, ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वाऱ्यासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

****

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज गुवाहाटी इथं राजस्थान रॉयल्सचा सामना पंजाब किंग्जशी होणार आहे. पंजाब किंग्ज संघ आधीच प्ले ऑफमधून बाहेर पडला आहे, तर राजस्थान रॉयल्सचं अव्वल चार संघात स्थान मिळवण्याचं लक्ष्य असेल. दरम्यान, काल रात्री दिल्ली इथं झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सनं लखनौ सुपर जायंट्स संघाचा १९ धावांनी पराभव केला.

****